# मराठी (१०९) [ Marathi ]

## इयत्ता : बारावी [ STD. XII ]

## नमुना प्रश्न-पत्रिका:२०१९ - २०२० [Sample paper : 2019-20]

समय : ३ तास एकूण अंक : ८०

सर्वसाधारण सूचना :

१. या प्रश्नपत्रिकेत - अ,ब,क,ड - असे चार विभाग आहेत.

२. सर्व विभाग आवश्यक आहेत.

३. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.

४. एका विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग : अ [आकलन]

प्रश्न १) पुढील परिच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

..... गेली काही वर्षे ‘मराठी’ची गरज कशी नाही याचा प्रचार येत आहे. विशेषत: विज्ञान आणि वाणिज्य शाखांमधील विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर ‘मराठी नको’ या मताचा प्रभाव टाकण्यात आला आहे. पुढे तर प्रश्नच नाही ! भाषेचा किंवा साहित्याचा वाराही लागू नये अशीच व्यवस्था केलेली आहे. इयत्ता पहिलीपासून दहावीपर्यंत मराठीचा आग्रह धरलेला आहे, अकरावीपासून मराठी विषय सोडला तरी चालेल अशी व्यवस्था केलेली आहे. हे योग्य नाही!

‘बी.एस्सी.’ व ‘बी.कॉम.’कडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ‘मराठी साहित्य’ घेण्याची संधीच नाकारलेली आहे. बहुसंख्य विद्यार्थी तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, व्यवस्थापनविद्या या शाखांकडे जातात.त्यांच्या अभ्यासात भाषाही नाही अन् साहित्यही नाही!

ही स्थिती भाषेच्या, साहित्याच्या, संस्कृतीच्या, आणि मुख्य म्हणजे त्या विद्यार्थ्यांच्या जीवनाच्या दृष्टीनेही चांगली नाही. सर्व विद्याशाखांमध्ये साहित्य हा विषय ठेवावा. मराठी, हिंदी, गुजराती .. अशी कोणतीही भारतीय भाषा निवडण्याचा विकल्प मुलांना द्यावा.

साहित्य भावनेचा स्पर्श घडवते, विचारांना चालना देते. साहित्य मानवी संवेदना जागवणारे असते. जगातल्या जीवजंतुंविषयी आत्मीयता वाटणे, आपले व इतरांचे जगणे सुंदर करावेसे वाटणे हा साहित्याचा, कलांचा संस्कार असतो. अशा अनुभवांपासून आपल्याला, आपल्या मुलांना तोडून टाकणारी शिक्षणपद्धती आपण चालवली आहे. ही बदललीच पाहिजे.

समाजात जनभावना समजून वागणारे चांगले कार्यकर्ते, कर्तव्यदक्ष आणि सहृदय अधिकारी, समाजातील आर्थिकवर्गाचे भान असलेले डॉक्टर, न्यायासाठी झटणारे वकील, मुलांची सर्वांगीण उन्नती झाली पाहिजे यासाठी तळमळणारे शिक्षक-प्राध्यापक, आपल्या

समाजाचा संतुलित विकास झाला पाहिजे असे समजणारे उद्योगपती,सगळ्यांना योग्य तो वाटा मिळाला पाहिजे याकडे लक्ष देणारे व्यापारी हे सगळे लोक आपल्याला हवे आहेत की नकोत ? हवे असतील तर भाषा-साहित्य-कला यांपासून मुलांना तोडू नका. केवळ 'करिअर' समोर ठेऊन मुलांचे रुपांतर उच्चभ्रू आणि परात्म कामगारांमध्ये करून टाकत आहोत हे लक्षात घ्या.

भाषा केवळ व्यक्तींमध्ये संवाद साधणारी नसते ! ती संस्कृतीची वाहक असते. अनेक पिढ्यांच्या ज्ञानाचा, अनुभवांचा त्यात संचय असतो. संस्कृती आपल्या मौखिक आणि लिखित साहित्याच्या माध्यमातून मूल्यांची अभिव्यक्ती करते. या मूल्यांमुळेच आपल्याशी आपली ओळख होते. एकंदर विश्वात आपले स्थान काय आहे ते समजते. अशा आपल्या भाषेपासून दूर करून आपण आपल्या मुलांना स्वत:ची ओळख करून घेण्याची संधी नाकारत आहोत.

प्रश्न १:अ) वाचलेल्या परिच्छेदाधारे योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (३)

१) विद्यार्थ्यांच्या जीवनाच्या दृष्टीने हे चांगले नाही की .....

क] मराठी शिकता येत नाही.

ख] त्यांच्यावर संस्कार घडत नाहीत.

ग] त्यांच्या शिक्षणात भाषा व साहित्य नाही.

२) मुलांच्या शिक्षणामागे केवळ 'करिअर'चा दृष्टीकोन ठेवल्याने -

क] मुलांना जीवनात यशस्वी बनवतोय.

ख]मुलांना पगारदार गुलाम बनवतोय.

ग] मुलांना सहृदय व्यक्ती बनवतोय.

३) भाषेच्या अभ्यासामुळे .........

क] आपली स्वत:ची ओळख करून घेण्याची संधी मिळते.

ख] केवळ सर्वांशी संवाद साधता येतो.

ग] केवळ कामगार बनवले जाते.

प्रश्न १ आ] पुढील प्रश्नांची २/३ वाक्यात उत्तरे लिहा.

१) उच्च शिक्षणात साहित्याचा वाराही न लागू देण्याची व्यवस्था कशी केली आहे? (२)

२) भाषा संवाद साधण्याबरोबरच संस्कृतीची वाहक कशी बनते ? (२)

प्रश्न १ इ ) सविस्तर उत्तर लिहा. (३)

१) साहित्य-कलांच्या अभ्यासामुळे समाजजीवनावर कोणकोणते चांगले परिणाम होतील ?

प्रश्न २) पुढे दिलेली कविता वाचा आणि त्याधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

अंधाराचे युग संपायला पाहिजे
गरीब आणि श्रीमंत

यातील ही तफावत
युगायुगाची अभेद्य भिंत
कोणीतरी फोडली पाहिजे.
सरस्वतीच्या आगमनासाठी
चारही कवाडे उघडली पाहिजेत
एकलव्याला न्याय मिळालाच पाहिजे
लक्ष्मी मात्र राजमार्गानेच आली पाहिजे
खरंच काहीतरी व्हायला पाहिजे
मनामनात स्वप्नाळलेला कल्पनेचा तीर
प्रत्यक्षात गाठला पाहिजे
"तुला आहे, मला नाही" हे
सारं थांबलं पाहिजे
खरंच काहीतरी व्हायला पाहिजे.

प्रश्न २ अ) दिलेल्या कवितेच्या आधारे योग्य पर्याय निवडून अचूक उत्तर लिहा. (२)

१) अंधाराचे युग संपावे यासाठी .........
 क] दिवा लावावा.
 ख] गरीब श्रीमंत यांतील अंतर कमी करावे.
 ग] अधिकाधिक झाडे लावावीत.

२) 'सरस्वती'साठी चारही कवाडे उघडली पाहिजेत, म्हणजे ....
 क] सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे .
 ख] चारही मार्गाने व्यापार खुला व्हावा.
 ग] सर्वांना हवा व प्रकाश मिळावा.

प्रश्न २ आ) पुढील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (३)

१) संपत्ती कशी आली पाहिजे ?
२) कवीच्या मते काय थांबले पाहिजे ?
३) कशाचा तीर प्रत्यक्षात गाठला पाहिजे ?

## विभाग : ब [लेखन]

प्रश्न ३) पुढीलपैकी एका विषयावर अंदाजे २५०/३०० शब्दांत निबंध लिहा. (१०)

१. अंधश्रद्धा : एक सामाजिक कीड
२. स्त्री : कुटुंबाचा आधार
३. सार्वजनिक स्वच्छता : माझे कर्तव्य

४. हसणे म्हणजे मानवाला मिळालेले वरदान

प्रश्न ४ अ] संवाद - लेखन / वृत्त लेखन (५)

शहरात राहणारा विनू आणि गावाहून आलेला गणू हे दोघे मित्र 'पाण्याची कमतरता आणि आपले कर्तव्य' या संबंधी बोलत आहेत. तुम्ही आपल्या कल्पनेने तो चालू असलेला संवाद अंदाजे ७०/७५ शब्दांत लिहा.

अथवा

ब] आपल्या महाविद्यालयाचा 'दर्पण' या वार्षिक अंकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध कवी श्री. सलील खरे यांच्या हस्ते झाले. याची बातमी तयार करा.

## विभाग : क [व्याकरण ]

प्रश्न ५ अ) कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती करून वाक्ये लिहा. ( **कोणतेही चार** ) (८)

१] तिचा आवाज खूप सुंदर आहे. [उद्गारवाचक वाक्य करा.]

२] तुकाराम धीट नव्हता. [ वाक्य होकारार्थी करा.]

३] तिने पटणीची भाकरी केली. [कर्तरी प्रयोग करा.]

४] तू आमच्या घरी जेवशील ? [ वाक्य वर्तमानकाळात लिहा.]

५] मानसी गणिताचे पेपर सोडवते. [ कर्मणी प्रयोग करा.]

६] देशात निवडणुका सुरु आहेत. [ वाक्य भविष्यकाळात लिहा.]

प्रश्न ५ आ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा.

i) अधोरेखित शब्दाचे वचन बदलून लिहा. [ **कोणतेही दोन** ] [२]

१. माझ्या गावात प्राचीन <u>मंदिर</u> आहे.

क] आमच्या गावात प्राचीन मंदिर आहे. ख] माझ्या गावात प्राचीन मंदिरे आहेत.

ग] माझ्या गावात प्राचीन मंदिर आहेत.

२. ती फुलझाडांची <u>रोपे</u> होती.

क] ते फुलझाडाचे रोप होते. ख] ती फुलझाडाची रोप होते.

ग] तो फुलझाडाचा रोप होता.

३. बाबूरावांनी यंत्रमानवाला <u>आज्ञा</u> दिली.

क] बाबुरावांनी यंत्रमानवांना आज्ञा दिल्या. ख] बाबूरावांनी यंत्रमानवाला आज्ञे दिले.

ग] बाबूरावांनी यंत्रमानवाला आज्ञा दिल्या.

ii] पुढील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा. [ **कोणतेही दोन** ] [२]

१. पोटात कावळे ओरडणे.

क] पोटात खूप दुखणे. ख] भुकेने व्याकूळ होणे. ग] खूप किरकिर करणे.

२. तोंड भरून बोलणे.

क] खूप स्तुती करणे. ख] खूप निंदा करणे. ग] अति बोलणे.

३. भाऊबंदकी असणे.

क] भावाभावांत प्रेमाचे बंधन असणे. ख] भावाभावांत भांडण असणे.

ग] एकमेकांची काळजी घेणे.

प्रश्न ५ इ)पुढे दिलेल्या शब्दांचा क्रियाविशेषण रूपाने अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा. [३]

क] मोकळेपणाने ख] बरोबर ग] हसत हसत

प्रश्न ५ उ) दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती करून उत्तरे लिहा. ( **कोणतेही पाच** ) [५]

१. अनिकेत तल्लख बुद्धीचा मुलगा आहे. ( वाक्यातील विशेषण ओळखा.)

२. तुकारामला (पाहुणा)ने हसतच विचारले. (कंसातील शब्दाचे योग्य रूप वापरा.)

३. बिलीमोरा हे एक छोटेखानी गाव आहे. ( वाक्यातील विशेष नाम ओळखा.)

४. ती <u>भडभडा</u> बोलत होती. ( अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

५. मी बुटाची लेस सोडण्याचा प्रयत्न केला. थंडीमुळे मला ते शक्य झाले नाही.
(योग्य उभयान्वयी अव्यय वापरून एक वाक्य बनवा.)

६. आता आपण एक काम करू या. ( वाक्यातील सर्वनाम ओळखा.)

७. आकाशवाणी हे घराघरा( साठी / वर / पर्यंत) पोचलेले मध्यम आहे.
( दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय वापरून वाक्य लिहा.)

८.सारा वर्ग <u>शांत</u> होता. ( अधोरेखिताचे भाववाचक रूप वापरून वाक्य लिहा.)

## विभाग : ड [ गद्य - पद्य विभाग ]

प्रश्न ६ अ] पुढीलपैकी दोन प्रश्नांची सुमारे ८० शब्दांत उत्तरे लिहा. (१०)

१] सूनबाईंनी बाबुरावांकडे कोणाविरुद्ध कोणत्या तक्रारी केल्या ?

२] लेखिकेला मुंबईचा समुद्र /चौपाटी यापेक्षा मुरुडचा समुद्र कसा वेगळा जाणवला ?

३] फ्रामरोझला त्याचे नंदनवन याच जीवनात कसे मिळाले ?

४] गुंडगुळ्याच्या माळावर एका भुताचा जन्म कसा झाला ?

ब] पुढील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. [४]

१] चीनी शिपायांनी डोग्रा जवानाला का मारले ?

२] अभियंत्याच्या मते बाबुरावांच्या नातवासाठी कोणती चांगली भेट ठरेल ?

३] मिस्टर उन्नीकृष्णन यांच्या पत्नीचे लोभस वेगळेपण कसे जाणवते ?

४] रानडे पती-पत्नी मानसीच्या दहावीच्या पूर्वतयारीची एवढी दक्षता का घेत होते ?

प्रश्न ७ अ] पुढीलपैकी दोन प्रश्नांची सुमारे ७०/८० शब्दांत उत्तरे लिहा. [८]

१] कवी कुसुमाग्रजांनी 'आवाहन'मधून राष्ट्रीय एकतेची भावना कशी व्यक्त केली आहे ?

२] कवयित्री शांता शेळके 'राबण्याचा गाव तिला लग्नात मिळाला आंदण' असे का म्हणतात?

३] विंदा करंदीकर यांच्या कवितेतून संयमित प्रेमभाव कसा व्यक्त झाला आहे ?

४] 'उदास हे वाळलेले पुन्हा बहरतील मळे' असे कवीला का वाटते ?

ब] दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा. (२)

१] समरदेवता बोलावते आहे ........

क] शूर सैनिकांना ख] समरपुरच्या वारकऱ्यांना ग] देशवासीयांना

२] स्वप्नात मागे कुणी जल्लाद धावत आहे असे दिसले की, ......

क] तुला धावता येत नाही

ख] तुला ओरडता येत नाही.

ग] तुला गाता येते.

इ] पुढील काव्यपंक्तींचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ( कोणतेही दोन) (६)

१] नारळ कठीण दिसे | भितरी खोबरें अरुवार |
तैसे साधूचे अंतर | बोधे वोसंडले ||

२] आला पिकाले बहार झाली शेतामधी दाटी
कसे वाऱ्यानं डोलती दाने आले गाडी गाडी

३] असा कसा मुकाच झालो ! चर्चा केली नको नको ती;
हास्याच्या उठल्या लहरी, पण मनात लपले मनचे मोती.

४] आता या विशाल औद्योगिक शहराच्या मर्यादा
तुझ्याप्रमाणेच मलाही भासू लागल्याहेत छोट्या